# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा/ ४९८ /२०२१-२२ दिनांक :- १९/ ०१/2022

प्रति,
सिस्टम अॅनालिस्ट,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- संकेतस्थळावर जाहीर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधीत होणारी / धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामाची सोबत जोडलेली जाहीर नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- जाहीर नोटीस प्रत.**

(योगेश गुणीजन)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३


जा.क्र.मनपा/वृ.प्रा / ४९८ /2021-22 दिनांक :- १४ /01/2022

## // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 1. | भाईंदर (प.) गीता नगर, फाटक रोड, येथील सोसयटीच्या इमारतीच्या उदयानात उंच वाढलेले असून सदर झाडाला बुंध्याला किड लागलेली असून झाड खराब झालेले आहे. सदरउदयानात लहान मुले खेळत असून झाड जोराच्या वाऱ्याने पडून जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर 01 नग बदामाचे झाड तातडीने काढणे आवश्यक आहे. **(श्री मोरेश्वर को.ऑ.हौ.सोसायटी यांचे दि.31/05/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग बदाम |
| 2. | भाईंदर (पु.) तलाव रोड येथील सिध्दीविनायक इमारतीच्या मागील बाजुस उंच वाढलेले असून सदर झाडाची मुळ पाण्याच्या टाकीत जाऊन इमारतीमधील नागरीकांना दुषित पाणी येत आहे. सदर झाडापासून धोका निर्माण होत असलयाने झाड काढणे आवश्यक आहे. (सन्मा. नगरसेविका सौ.कुसुम संतोष गुप्ता यांचे दि.**26/11/2021** रोजीचे पत्र.) | 01 नग नारळ |
| 3. | भाईंदर (पु.) इंद्रप्रस्त कॉम्पलेक्स नवघर गाव येथील ओम सिध्दी ऑर्कड को.ऑ.हौ.सोसायटीच्या आवारात उंच वाढलेले असून सदर झाडाची मुळ बाहेर आलेली आहेत. त्यामुळे कठडा तुटलेला आहे. इमारतीच्या आवारात लहान मुले खेळत असून झाड जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवीत वा वित्त हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर झाडापासून धोका निर्माण होत असलयाने झाड काढणे आवश्यक आहे. (सन्मा. नगरसेविका सौ.वंदना विकास पाटील यांचे दि.**05/10/2021** रोजीचे पत्र.) | 01 नग नारळ |
| 4. | सदरचे झाड भाईंदर (प.) अर्जदार Brine S.Rodricks रा.चर्च रोड, नवरंग रोडवेज येथील चर्चजवळ उंच वाढलेले असून सरदचे झाड अर्ध्यातुन पोकळ झालेले आहे. तसेच झाड भिंतीला लागून असल्यामुळे भिंतीला तडे जात आहेत. सदर रस्त्यावरून शाळेतील विद्यार्थी ये-जा करत असल्याने जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवीत वा वित्त हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर झाड तातडीने काढणे आवश्यक आहे. (Brine S.Rodricks **यांचे दि.27/12/2021 रोजीचे पत्र)** | 01 नग अशोक |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त् (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

(योगेश गुणीजन)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका



Scanned with CamScanner